पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८
मा. विधी समिति
कार्यपत्रिका क्रमांक : ११

**सभावृत्तांत**

दिनांक : ०५ / १० / २०१२ वेळ : दुपारी ३ :०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक ०५ / १० / २०१२ रोजी दुपारी ३:०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेत खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. प्रसाद शेट्टी - सभापती
२) मा. ननवरे जितेंद्र बाबा
३) मा. सुपे आशा रविंद्र
४) मा. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
५) मा. नेटके सुमन राजेंद्र
६) मा. विनोद जयवंत नढे
७) मा. आल्हाट धनंजय मुरलीधर

या शिवाय मा.सावंत - सह आयुक्त, मा.टेकाळे - सहा.आयुक्त, मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.ढगे - कार्य.अभियंता हे अधिकारी उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.४ :- निरुपयोगी साहित्याचा लिलाव करणेबाबत.

विषय क्र.५ :- सांगवी / दापोडी मैलाशुध्दीकरण केंद्रांतर्गत दापोडी येथे स.नं. ३६ च्या जागेस सिमाभिंत बांधणेबाबत.

विषय क्र.६ :- जलक्षेत्र क्र. क/३ अंतर्गत भोसरी चक्रपाणी वसाहत परिसरातील वितरण व्यवस्थे अंतर्गत गुरुत्व वाहिनीवरील थेट पाणीपुरवठा बंद करुन उंच टाकीमार्फत पाणी पुरवठा करणेकामी पांजरपोळ येथील जुन्या टाकी शेजारी नविन उंच टाकी बांधणेबाबत.

विषय क्र.७ :- अंदाजपत्रकीय तरतुदीतील कामाचे ठिकाण बदलणेबाबत - मा. नितीन लांडगे, मा. जितेंद्र ननवरे यांचा प्रस्ताव.

----------

**अ) दिनांक ०७/०९/२०१२ व २१/०९/२०११२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र. ९) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

**ब) दिनांक २१/०९/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र. १०) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

----------

ठराव क्रमांक :- ६३ विषय क्रमांक :- १

दिनांक :- ०५/१०/२०१२ विभाग :- झोनिपु स्थापत्य

सुचक : मा. जितेंद्र ननवरे अनुमोदक :- मा. नितीन लांडगे

संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/८३४/२०१२, दि.०४/०९/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वॉर्ड क्र.३५ मोरवाडीमधील (लालटोपीनगर) झोपडपट्टीमध्ये शौचालय बांधणेचे काम थेट पध्दतीने मे. सुलभ इन्टरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन या संस्थेस देण्यास तसेच सदर कामाची अंदाजपत्रकीय किंमत र.रु.२९,०६,९०५/- असल्याने सदर कामास व अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ६४ विषय क्रमांक :- २

दिनांक :- ०५/१०/२०१२ विभाग :- झोनिपु स्थापत्य

सुचक : मा. धनंजय आल्हाट अनुमोदक :- मा. विनोद नढे

संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/८३३/२०१२, दि.०४/०९/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.७८ मधील तापकीरनगर झोपडपट्टीमध्ये शौचालय बांधणेचे काम थेट पध्दतीने मे. सुलभ इन्टरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन या संस्थेस देण्यास तसेच सदर कामाची अंदाजपत्रकीय किंमत र.रु.२९,०६,९०५/- असल्याने सदर कामास व अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ६५ विषय क्रमांक :- ३

दिनांक :- ०५/१०/२०१२ विभाग :- प्रशासन

सुचक : मा. जितेंद्र ननवरे अनुमोदक :- मा. धनंजय आल्हाट

संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/१०४४/२०१२, दि.२४/०९/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्रीम. आशाराणी पाटील, प्रशासन अधिकारी पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दि. ०१/११/२०१२ पासून १ वर्ष कालावधीकरीता प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मुदतवाढ देणेस मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.</u>**

ठराव क्रमांक :- ६६ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- ०५/१०/२०१२ विभाग :- मध्यवर्ती भांडार
सुचक : मा. जितेंद्र ननवरे अनुमोदक :- मा. धनंजय आल्हाट
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभा/७/कावि/३०९/२०१२, दि.२६/०९/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विदयुत , स्थापत्य, आयटीआय मोरवाडी, आरोग्य, संगणक, अतिक्रमण, उदयान, जलशुध्दिकरण केंद्र निगडी इ.विभागाचे प्रस्तावासोबतचे विभागवार तक्ता परिशिष्ट " अ " प्रमाणे भंगार साहित्याची अंदाजे किंमत र.रु.३,५४,७२,०८३/- येत आहे. सदरची किंमत र.रु.५००/- पेक्षा जास्त येत असल्याने जाहिर लिलाव करुन त्या साहित्याची विल्हेवाट लावणेकरिता मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ६७ विषय क्रमांक :- ५
दिनांक :- ०५/१०/२०१२ विभाग :- पाणीपुरवठा जलनि:सारण
सुचक : मा. धनंजय आल्हाट अनुमोदक :- मा. विनोद नढे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.कप्र/पापु/जनि/१०४३/२०१२, दि.०१/१०/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सांगवी / दापोडी मैलाशुध्दीकरण केंद्रांतर्गत दापोडी येथे स.नं. ३६ च्या जागेस सिमाभिंत बांधणेकामी येणा-या र.रु.२,५८,६२,०००/- (अक्षरी र.रु.दोन कोटी, अठ्ठावन्न लाख, बासष्ट हजार फक्त ) चे अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांतकायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ६८ विषय क्रमांक :- ६
दिनांक :- ०५/१०/२०१२ विभाग :- पाणीपुरवठा क प्रभाग
सुचक : मा. नितीन लांडगे अनुमोदक :- मा. जितेंद्र ननवरे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पापु/कप्र/०४/कावि/१०४/२०१२, दि.०३/१०/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

जलक्षेत्र क्र. क/३ अंतर्गत भोसरी चक्रपाणी वसाहत परिसरातील वितरण व्यवस्थे अंतर्गत गुरुत्व वाहिनीवरील थेट पाणीपुरवठा बंद करुन उंच टाकीमार्फत पाणी पुरवठा करणेकामी पांजरपोळ येथील जुन्या टाकी शेजारी नविन उंच टाकी बांधणेकामी येणा-या र.रु.१,१०,०००/- ( अक्षरी र.रु.एक कोटी, दहा लाख फक्त ) चे अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ६९ विषय क्रमांक :- ७
दिनांक :- ०५/१०/२०१२
सुचक : मा. नितीन लांडगे अनुमोदक :- मा. जितेंद्र ननवरे
संदर्भ :- मा. नितीन लांडगे, मा.जितेंद्र ननवरे यांचा प्रस्ताव -

भोसरी गावठाण प्रभाग क्र.३५ या ठिकाणी स्थापत्य विषयक कामे करणे या शिर्षकाखाली सर्व्हे क्र.१ येथील बैलगाडा घाट दुरुस्ती करणेकामी अंदाजपत्रकीय (रक्कम रु.दहा लाख) तरतुद केलेली आहे. सदर तरतुद ही सर्व्हे क्र.१ मधीलच कुस्ती आखाडा दुरुस्तीकरणेकामीचे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( प्रसाद शेट्टी )**
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ १२४८ /२०१२
दिनांक - ०५ / १० / २०१२ चे लगत

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

\\१७२.१६.०.६७\e drive\Nagersachiv१\Vidhi-१२-१३ new\Vidhi Proceeding_१० doc